**सोलापूर महानगरपालिका**
**सभेचा इतिवृत्तांत**
**(मा.सर्वसाधारण सभा संदर्भ)**
**उप-समिती बैठक क्रमांक -३९**

सोलापूर महानगरपालिका, जा.क्र.नआ/वै/९११ मा.आयुक्त कार्यालय दि. ११.०३.२०२२ रोजीच्या मा.प्रशासकसो यांच्या आदेशाने मा.अति.आयुक्त, मा.मुख्यलेखापरिक्षक, नगरसचिव व विषयाशी संबंधित विभागाचे खातेप्रमुख/सहा.आयुक्त, यांची उप-समिती गटीत करणेत आली आहे. सदर प्रस्तावा बाबत प्रशासकीय दप्तरी ठराव करणेकामी मा.उपसमितीचे शिफारसी करिता दि.०४/०८/२०२२ रोजी उपसमिती बैठक क्रं.३८ संपलेनंतर मा.अति.आयुक्त यांचे कार्यालय येथे बैठक बोलाविणेत आली होती.
सदर सभेस खालील सदस्य उपस्थित होते.

| अ.क. | अधिकारी/ कर्मचारी | हुद्दा |
|---|---|---|
| १ | मा.श्री.विजय खोराटे | अतिरिक्त आयुक्त |
| २ | मा.श्रीमती.रुपाली कोळी | मुख्यलेखापरिक्षक |
| ३ | मा.श्री.प्रविण दंतकाळे | नगरसचिव |
| ४ | मा.श्री.मच्छींद्र घोलप | उपायुक्त |
| ५ | मा.श्री.विक्रमसिंह पाटील | सहा.आयुक्त |

| अ.क्र | विषय क्रमांक | विषयाचा तपशील | संबंधित खातेप्रमुख / सहा.आयुक्त | मा.प्रशासक यांचेकडे विषया संबंधी निर्णय घेणे कामी उपसमितीची शिफारस |
|---|---|---|---|---|
| १ | ८४ | स्वा.वीर सावरकर जलतरण तलाव हे सर्वात जास्तीचे दराचे निविदाधारक श्री.हरीदास गोपाळ शुक्ला यांचेकडून त्यांनी निविदेत दिलेल्या र.रु.२१,००,१५१.००/- या दराने स्वा.वीर सावरकर जलतरण तलाव ११ महिन्याकरीता त्यांना सक्षम मान्यतेअंती जागेचा कब्जा देण्यास, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७९(क) अन्वये व मालमत्ता हस्तांतर नियमास अधिन राहुन सदरचे जलतरण तलाव निश्चित तारखेपासून ११ महिन्याकरीता अभिकर्त्यामार्फत चालविणेस देणेस व योग्य त्या स्टॅम्प पेपरवर करारपत्र करून घेण्यास मा.सर्वसाधारण सभेकडे निर्णयास्तव पाठविणे आवश्यक आहे परंतू सध्या मा.सर्वसाधारण सभा अस्तित्वात नसल्याने, मा.प्रशासक यांची नियुक्ती झाल्याने दि.११/०३/२०२२ ने गटीत झालेल्या उपसमितीमार्फत मा.प्रशासक यांचेकडे **निर्णयास्तव** पाठविणे कामी मा.आयुक्त यांचे दि.२९/०७/२०२२ ने आलेले प्रकरण **(ई-६००९४) SPORTS** | उपायुक्त | **प्रस्तावितप्रमाणे मान्यता देण्यात येत आहे.** |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २ | ८५ | छत्रपती संभाजी महाराज तलाव (कंबर तलाव) येथे बोटींग साठी मक्ता निश्चित करणे बाबत प्रस्तावित प्रमाणे प्राप्त निविदा धारक युनिटी मल्टीकॉन प्रा.लि. यांचेकडून त्यांनी निविदेत दिलेल्या दराऐवजी वाटाघाटी अंती निश्चित व मान्य केलेल्या र.रु.९,६०,०००/- (वार्षिक) या दराने प्रस्तावात नमूद प्रमाणे काम करून घेणे कामी सक्षम मान्यतेअंती बोटींग साठी देण्यास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमचे कलम ७९ अन्वये व मालमत्ता हस्तांतरण नियमास अधीन राहून सदरची जागा निश्चित तारखेपासून ९ वर्षे ११ महिने करीता भाड्याने देण्यास प्रस्तावित आहे. प्रकरणी यापूर्वी मा.म.न.पा. ठराव क्र.५५० दि.२४/०२/२०२२ च्या भक्ती मल्टी सर्व्हिसेस यांना वर्क ऑर्डर देण्याचा ठराव विखंडनासाठी मा.शासनाकडे सादर करण्यात आलेला आहे. या स्थितीत याप्रकरणी आजला प्रस्तावित केलेप्रमाणे मान्यतेस्तव प्रकरणी प्रशासकीय स्तरावर निर्णय घेऊन योग्य ती कार्यवाही ठेवण्यात यावी असा मा.मुख्यलेखापरिक्षक यांचा अभिप्राय आहे. प्रस्तावित प्रमाणे अधिनियामाचे तरतुदीनुसार म्हणजे कलम ७९ नुसार मा.सर्वसाधारण सभेची मान्यतेची आवश्यकता आहे परंतू सध्या मा.सर्वसाधारण सभा अस्तित्वात नसल्याने, मा.प्रशासक यांची नियुक्ती झाल्याने दि.११/०३/२०२२ ने गठीत झालेल्या उपसमितीमार्फत मा.प्रशासक यांचेकडे **निर्णयास्तव** पाठविणे कामी मा.आयुक्त यांचे दि.२९/०७/२०२२ ने आलेले प्रकरण **(ई-३८६१९) AMC L&E** | सहा.आयुक्त,. भू व मा | **प्रकरणी यापूर्वी मा.म.न.पा. ठराव क्र.५५० दि.२४/०२/२०२२ विखंडनासाठी मा.शासनाकडे सादर करण्यात आलेला आहे. सदर शासनाचे निर्णयास अधीन राहून या प्रकरणास प्रस्तावित प्रमाणे मान्यता देण्यात येत आहे.** |
| ३ | ८६ | महापालिका क्षेत्रामध्ये गणेशोत्सव साजरा करणाऱ्या मंडळाना मंडप मारण्यासाठी महापालिका परवानगी देत असते. दि.१५.०६.२०२२ पूर्वी सदरची परवानगी देत असताना प्रति १०० चौरस फुट साठी २०/- रु प्रतिदिन फी आकारली जायची. दि.१५/६/२०२२ रोजीच्या मा.आयुक्त यांच्या नगर अभियंता विभागाकडील परिपत्रकानुसार सदरचा मांडव परवाना फी प्रती १०० चौ.फुटास ५००/- रु प्रतिदिन फी आकारण्यात आली आहे. महाराष्ट्र राज्याचे मा.मुख्यमंत्री यांची दि.२१/७/२०२२ चे बैठकीत गणेश मंडळाचे मंडप परवानगीसाठी असणारे शुल्क माफ करण्याबाबत आदेश दिले आहेत. त्याप्रमाणे मुंबई महापालिकेची माहिती घेतली असता, सदरच्या आदेशान्वये त्यांनी प्रस्तावात नमूद आदेशाचे परिपत्रक दि.२२/७/२०२२ | सहा.आयुक्त/भू. व मा. | **प्रकरणास मान्यता देण्यात येत आहे.** |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | रोजी निर्गमित केलेले आहे. प्रस्तावित केल्याप्रमाणे मंडळ मंडप परवाना शुल्क माफ करण्याबाबतचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेची मान्यतेची आवश्यकता आहे परंतू सध्या मा.सर्वसाधारण सभा अस्तित्वात नसल्याने, मा.प्रशासक यांची नियुक्ती झाल्याने दि.११/०३/२०२२ ने गठीत झालेल्या उपसमितीमार्फत मा.प्रशासक यांचेकडे **मान्यतेस्तव** पाठविणे कामी मा.आयुक्त यांचे दि.४/०८/२०२२ ने आलेले **प्रकरण ई- ७०७९७ AMC L&E** | | |

मा.सहा.आयुक्त
सोलापूर महानगरपालिका

मा.उपायुक्त
सोलापूर महानगरपालिका

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

मा.मुख्यलेखापरिक्षक
सोलापूर महानगरपालिका

मा.अति.आयुक्त
सोलापूर महानगरपालिका

# सोलापूर महानगरपालिका
## प्रशासक ठराव
## विषय क्र.८४ ठराव क्र.८४ दिनांक. ०४/०८/२०२२
## (मा.सर्वसाधारण सभा संदर्भ )

८४

स्वा.वीर सावरकर जलतरण तलाव हे सर्वात जास्तीचे दराचे निविदाधारक श्री.हरीदास गोपाळ शुक्ला यांचेकडून त्यांनी निविदेत दिलेल्या र.रु.२१,००,१५१.००/- या दराने स्वा.वीर सावरकर जलतरण तलाव ११ महिन्याकरीता त्यांना सक्षम मान्यतेअंती जागेचा कब्जा देण्यास, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७९(क) अन्वये व मालमत्ता हस्तांतर नियमास अधिन राहुन सदरचे जलतरण तलाव निश्चित तारखेपासून ११ महिन्याकरीता अभिकर्त्यामार्फत चालविणेस देणेस व योग्य त्या स्टॅम्प पेपरवर करारपत्र करून घेण्यास मा.सर्वसाधारण सभेकडे निर्णयास्तव पाठविणे आवश्यक आहे परंतू सध्या मा.सर्वसाधारण सभा अस्तित्वात नसल्याने, मा.प्रशासक यांची नियुक्ती झाल्याने दि.११/०३/२०२२ ने गठीत झालेल्या उपसमितीमार्फत मा.प्रशासक यांचेकडे **निर्णयास्तव** पाठविणे कामी मा.आयुक्त यांचे दि.२९/०७/२०२२ ने आलेले **प्रकरणास मान्यता देण्यात येत आहे.**

(प्रविण प्रे.दंतकाळे)
नगरसचिव
सोलापूर महानगरपालिका

(पि.शिवशंकर, भा.प्र.से.)
प्रशासक
सोलापूर महानगरपालिका

**सोलापूर महानगरपालिका**
**प्रशासक ठराव**
**विषय क्र.८५ ठराव क्र.८५ दिनांक. ०४/०८/२०२२**
**(मा.सर्वसाधारण सभा संदर्भ )**

८५

छत्रपती संभाजी महाराज तलाव (कंबर तलाव) येथे बोटींग साठी मक्ता निश्चित करणे बाबत प्रस्तावित प्रमाणे प्राप्त निविदा धारक युनिटी मल्टीकॉन प्रा.लि. यांचेकडून त्यांनी निविदेत दिलेल्या दराऐवजी वाटाघाटी अंती निश्चित व मान्य केलेल्या र.रु.९,६०,०००/- (वार्षिक) या दराने प्रस्तावात नमूद प्रमाणे काम करून घेणे कामी सक्षम मान्यतेअंती बोटींग साठी देण्यास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमचे कलम ७९ अन्वये व मालमत्ता हस्तांतरण नियमास अधीन राहून सदरची जागा निश्चित तारखेपासून ९ वर्षे ११ महिने करीता भाड्याने देण्यास प्रस्तावित आहे. प्रकरणी यापूर्वी मा.म.न.पा. ठराव क्र.५५० दि.२४/०२/२०२२ च्या भक्ती मल्टी सर्व्हिसेस यांना वर्क ऑर्डर देण्याचा ठराव विखंडनासाठी मा.शासनाकडे सादर करण्यात आलेला आहे. या स्थितीत याप्रकरणी आजला प्रस्तावित केलेप्रमाणे मान्यतेस्तव प्रकरणी प्रशासकीय स्तरावर निर्णय घेऊन योग्य ती कार्यवाही ठेवण्यात यावी असा मा.मुख्यलेखापरिक्षक यांचा अभिप्राय आहे. प्रस्तावित प्रमाणे अधिनियामाचे तरतुदीनुसार म्हणजे कलम ७९ नुसार मा.सर्वसाधारण सभेची मान्यतेची आवश्यकता आहे परंतू सध्या मा.सर्वसाधारण सभा अस्तित्वात नसल्याने, मा.प्रशासक यांची नियुक्ती झाल्याने दि.११/०३/२०२२ ने गठीत झालेल्या उपसमितीमार्फत मा.प्रशासक यांचेकडे निर्णयास्तव पाठविणे कामी मा.आयुक्त यांचे दि.२९/०७/२०२२ ने आलेले **प्रकरणी यापूर्वी मा.म.न.पा. ठराव क्र.५५० दि.२४/०२/२०२२ विखंडनासाठी मा.शासनाकडे सादर करण्यात आलेला आहे. सदर शासनाचे निर्णयास अधीन राहून या प्रकरणास प्रस्तावित प्रमाणे मान्यता देण्यात येत आहे.**

(प्रविण प्रे.दंतकाळे)
नगरसचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिका
मा.प्रशासक कार्यालय

(पि.शिवशंकर, भा.प्र.से.)
प्रशासक
सोलापूर महानगरपालिका

**सोलापूर महानगरपालिका**
**प्रशासक ठराव**
**विषय क्र.८६ ठराव क्र.८६ दिनांक. ०४/०८/२०२२**
**(मा.सर्वसाधारण सभा संदर्भ )**

८६

महापालिका क्षेत्रामध्ये गणेशोत्सव साजरा करणाऱ्या मंडळाना मंडप मारण्यासाठी महापालिका परवानगी देत असते. दि.१५.०६.२०२२ पूर्वी सदरची परवानगी देत असताना प्रति १०० चौरस फुट साठी २०/- रु प्रतिदिन फी आकारली जायची. दि.१५/६/२०२२ रोजीच्या मा.आयुक्त यांच्या नगर अभियंता विभागाकडील परिपत्रकानुसार सदरचा मांडव परवाना फी प्रती १०० चौ.फुटास ५००/- रु प्रतिदिन फी आकारण्यात आली आहे. महाराष्ट्र राज्याचे मा.मुख्यमंत्री यांची दि.२१/७/२०२२ चे बैठकीत गणेश मंडळाचे मंडप परवानगीसाठी असणारे शुल्क माफ करण्याबाबत आदेश दिले आहेत. त्याप्रमाणे मुंबई महापालिकेची माहिती घेतली असता, सदरच्या आदेशान्वये त्यांनी प्रस्तावात नमूद आदेशाचे परिपत्रक दि.२२/७/२०२२ रोजी निर्गमित केलेले आहे. प्रस्तावित केल्याप्रमाणे मंडळ मंडप परवाना शुल्क माफ करण्याबाबतचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेची मान्यतेची आवश्यकता आहे परंतू सध्या मा.सर्वसाधारण सभा अस्तित्वात नसल्याने, मा.प्रशासक यांची नियुक्ती झाल्याने दि.११/०३/२०२२ ने गठीत झालेल्या उपसमितीमार्फत मा.प्रशासक यांचेकडे **मान्यतेस्तव** पाठविणे कामी मा.आयुक्त यांचे दि.४/०८/२०२२ ने आलेले **प्रकरणास मान्यता देणेत येत आहे.**

(प्रविण प्रे.दंतकाळे)
नगरसचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिका
मा. प्रशासक कार्यालय

(पि.शिवशंकर, भा.प्र.से.)
प्रशासक
सोलापूर महानगरपालिका